उत्कृष्ठ क्वालिटी
शेंगदाणे १०० रु.किलो
जीरा २८० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने


WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.२१२ ■ मंगळवार १३ मे २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
☎-235222,मो.9021853108

## ऑपरेशन सिंदूर भारतीयांच्या भावनांचे प्रतिबिंब एकसंघ राहणे हीच खरी ताकद : पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली, दि.१२- भारताने राबविलेले ऑपरेशन सिंदूर हे केवळ मोहिमेचे नाव नाही तर कोट्यावधी भारतीयांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. ऑपरेशन सिंदूर ही न्यायाची अखंड प्रक्रिया आहे. भारताचे स्पष्ट मत आहे की, दहशतवाद आणि संवाद, दहशतवाद आणि व्यापार, पाणी आणि रक्त एकाचवेळी सोबत राहू शकत नाही. पाकिस्तानशी भारत चर्चा करेल तर ती फक्त दहशतवाद कसा संपवायचा आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरचे काय, याच मुद्द्यांवर चर्चा होईल. भारतीय सैन्यदलाचे तिन्ही विभाग सतत सतर्क राहणार आहेत. तेव्हा या परिस्थितीत आता एकसंघ राहणे हीच आपली ताकद आहे, असे स्पष्टीकरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले. पाकिस्तानवर ६ मेस रात्री हल्ला केल्यानंतर काय परिस्थिती आहे आणि भारत काय करणार आहे, याबाबत पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राला आज संबोधीत केले. विकसित भारताचे स्वप्न कोणत्याही परिस्थितीत साकारले जाईल, असा पुनरूच्चार करताना मोदी यांनी तिन्ही सैन्यदलाने केलेल्या कामगिरीबददल अभिमान वाटत असल्याचे सांगितले.**

पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २२ एप्रिलला पहलगाम मध्ये बेछूट गोळीबार करीत २६ जणाचे प्राण घेतले. त्यानंतर भारताने आक्रमक भुमिका घेऊन ऑपरेशन सिंदूर राबविले आणि पाकिस्तान तसेच पाकव्याप्त काश्मीर मधील दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण केंद्रांवर हल्ला करीत शंभरापेक्षा अधिक दहशतवादी ठार केले. दोन दिवसांपुर्वी शस्त्रसंधीची घोषणा झाली. त्यानंतर आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधीत केले. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले, दहशतवाद्यांनी पहलगाम मध्ये केलेला हल्ला हा मानवतेला काळीमा फासणारा आहे. या हल्ल्यामुळे मला व्यक्तीगत पातळीवर मोठे दुःख झाले. हा हल्ला बिभीत्स चेहरा दाखविणारा आणि सद्भावना तोडणारा होता. साऱ्या जगाने या हल्ल्याची निंदा केली आहे. पण, त्यानंतर कठोर होऊन निर्णय घ्यावा (पान ४ वर)



## दहावी निकाल आज दुपारी जाहीर होणार

मुंबई, दि.१२- महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावीचा निकाल मंगळवार दि.१३ रोजी दुपारी एकला जाहीर होणार आहे. विद्यार्थी मंडळाच्या संकेतस्थळावर विषयनिहाय गुण पाहू शकतील. गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीसाठी १४ ते २८ मे पर्यंत अर्ज करता येतील. पुनर्मूल्यांकनासाठी छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. पुरवणी परीक्षांसाठी अर्ज १५ मे पासून भरता येतील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक (पान ४ वर)

## महाराष्ट्र सरकार आता संरक्षण दलासोबत अधिक समन्वयाने काम करेल : फडणवीस

**मुंबई, दि.१२- राज्य सरकार संरक्षण दलांसोबत अधिक समन्वयाने काम करेल, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. भारत आणि पाकिस्तानमध्ये मागील काही दिवसांपासून निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संरक्षण दल आणि राज्य सरकार यांच्यात आज महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झाली.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. भारतीय लष्करातर्फे लेफ्ट. जनरल पवन चढ्ढा, कर्नल संदीप सील, भारतीय नौदलातर्फे रियर ॲडमिरल अनिल जग्गी, नौदल कमांडर नितेश गर्ग, भारतीय वायुदलातर्फे एअर वाईस मार्शल रजत मोहन हे बैठकीला उपस्थित होते. रिझर्व्ह बँक, जेएनपीटी, बीपीटी, मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज, एटीएस, होमगार्ड यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिक वापर आणि काय खबरदारी घ्यायची, यावर प्रामुख्याने बैठकीत चर्चा झाली. संरक्षण दलांना राज्य सरकारतर्फे अपेक्षित असलेले सहकार्य आणि अधिक गतीची समन्वय यंत्रणा उभारण्यावर (पान ४ वर)



## बुध्दपौर्णिमा म्हणजेच ज्ञान प्राप्तीचा दिवस धुळे जिल्ह्यात बौध्द पौर्णिमेनिमित्त उपक्रम

**धुळे, दि.१२- भगवान गौतम बुध्दांची जयंती आणि बुध्दपौर्णिमा म्हणजेच ज्ञान प्राप्तीचा दिवस. भगवान गौतम बुध्दांनी संपुर्ण जगाला शांतीचा आणि समतेचा संदेश दिला. गौतम बुध्दांची शिकवण प्रत्येकाने अंगीकारावी आणि आचारणात आणावी. त्यामुळे आपण आणि समाज प्रगत होईल, अशी भावना बुध्द जयंती निमित्त ठिकठिकाणी झालेल्या कार्यक्रमात व्यक्त झाली. धुळे शहरात पुरोगामी विचारमंच आणि संविधान समितीतर्फे कार्यक्रम झाला. तसेच शिंदखेडा येथील राजरत्न सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे बुध्द पौर्णिमेचे औचित्य साधुन विदयार्थ्यांना शालेय साहित्य वितरीत करण्यात आले.**

भगवान गौतम (पान ४ वर)

## शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी विभागाने प्रयत्न करावे खरीप हंगामपूर्व बैठकीत पालकमंत्री रावल यांचे आवाहन

**धुळे, दि.१२-जिल्ह्यातील कृषी उत्पादनात प्रत्येक पिकामध्ये सरासरी २५ टक्के वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, बिजप्रक्रिया, बियाण्याची उगवण क्षमता चाचणी, बी.बी.एफ यंत्राद्वारे सोयाबीन पेरणी, रासायनिक खतांची १० टक्के बचत, जमीन आरोग्य पत्रिकेनुसार खत व्यवस्थापन अशी मोहिम क्षेत्रियस्तरावर राबविण्यासाठी कृषी विभागाने प्रयतक करावे. अशा सूचना राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केल्यात.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात आज जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व २०२५ ची आढावा बैठक संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. बैठकीस आमदार काशिराम पावरा, मंजुळा गावित, माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ.सुभाष भामरे, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, उपवनसंरक्षक नितीनकुमार सिंग, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकात पवार, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, कृषि विकास अधिकारी सिताराम चौधरी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, जिल्ह्यात गतवर्षी ४ लाख ३६ हजार ६७६ हेक्टर क्षेत्रापैकी ३ लाख ८४ हजार १५९ हेक्टरवर खरीपाची पेरणी झाली होती. तर ९० हजार १२४ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली होती. म्हणजेच २५ टक्के क्षेत्रावर रब्बी पिकाची पेरणी होते. हे क्षेत्र वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा, उत्तम बियाणे, खतांचा पुरवठा, शेतीसाठी प्रशिक्षण शिबिरे, पाणी व्यवस्थापन, पीक विमा आणि अर्थसहाय्य योजना, शेतमालाला योग्य बाजार पेठ, कृषी विद्यापीठे व संशोधन संस्थाद्वारे नवे उपाय शोधून शेतकऱ्यांपर्यंत पोहचवाव्यात. डाळवर्गीय, तेलबिया पिकपेरा वाढविण्यात यावा. कृषी सहाय्यकांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांना हवामान, किड रोग, खत व्यवस्थापन, बियाणे लागवड, जागतिक पीक पेराची माहिती देण्यासाठी कृषी विभागाने चित्रफीतीच्या माध्यमातून व्हिडिओ तयार करावे त्यातून शेतकऱ्यामध्ये शेती शाळा, ग्रामसभा, व्हॉटसप व इतर समाज माध्यमातून जनजागृती करावी. बी-बियाणांच्या बाबतीत शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही तसेच जिल्ह्यात कुठेही बोगस बियाणे व खते विक्री होणार नाही. यासाठी कृषि विभागाने खते व बियाणे विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करावी. शेतकऱ्यांना मागणीनुसार खते व बियाणांचा (पान ४ वर)



## जवानांचे मनोबल उंचावण्यासाठी साक्रीत तिरंगा प्रतिकृतीची रॅली

**धुळे, दि.१२- भारतीय जवानांच्या शौर्याला नमन करत त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी साक्रीत तिरंगा रॅली काढण्यात आली. साक्रीतील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून रॅलीस सुरूवात झाली. गोल्ड परिसर, बस स्टँड, संतोषी माता मंदिर, बाजारपेठ, ओम शांती रोड मार्गावर रॅलीचे स्वागत झाले. यावेळी बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते.**

काश्मीर मधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला झाला. त्यात २६ भारतीय ठार झाले. त्यानंतर भारताने ऑपरेशन सिंदुर राबवुन आक्रमक भुमिका घेतली. युध्दजन्य परिस्थितीचा सराव करण्यापुर्वी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरात हल्ले करण्यात आले. त्यात शंभरावर दहशवादी ठार झाले. त्यानंतर पाकिस्तानने ड्रोन हल्ले केले. परंतु हे सर्व हल्ले भारतीय जवानांनी अपयशी केले. साहजिकच याबाबत सर्व भारतीयांना अभिमान आहे. जवानांना लढण्याचे बळ देण्यासाठी आम्ही सर्वजण सोबत आहोत, असे म्हणत साक्रीत तिरंगा रॅली काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून रॅलीस सुरूवात झाली. गोल्ड परिसर, बस (पान ४ वर)

## चाकुचा धाक दाखवून चोरी

धुळे, दि.१२- शिरपूर शहरातील भंडारी टॉकीज जवळ बॉम्बे बेकरी येथे चाकुचा धाक दाखवून गल्ल्यातील एक हजार आठशे रूपयांची रोख रक्कम बळजबरी चोरून नेल्याची घटना घडली आहे.रमजान अली हसन अली अन्सारी यांनी दि.११ मे रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिरपूर गावातील भंडारी टॉकीज भैरवबाबा मंदिराजवळी शुभम शरद माळी (वय २८) याने दि. १० मे रोजी रात्री ८ ते ११ मे रोजी रात्री एक सुमारास बॉम्बे बेकरीचा दरवाजा तोडून अनधिकृतपणे आत प्रवेश केला. बेकरीच्या गल्ल्यातील एक हजार आठशे रूपयांच्या चलनी नोटा बळजबरी काढून पळून गेला. याप्रकरणी शिरपूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मेहेरगावमध्ये एका रात्रीतून चार ठिकाणी चोऱ्यांचा प्रयत्न

**सोनगीर दि.१२ (प्रतिनिधी)- धुळे तालुक्यातील मेहेरगावात सोमवार (दि.१२) रोजी मध्यरात्री चोरीचा प्रयत्न झाला. मात्र सोनगीर पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठ्या चोरीची घटना टळली आहे. चोरट्यांनी या गावात एकाच वेळी चार ठिकाणी घरफोडी करण्याचा प्रयत्न केला परंतु पोलिसांच्या गस्ती वाहनाच्या सायरनमुळे त्यांचे मनसुबे फसले.**

मिळालेल्या माहितीनुसार, मेहेरगावातील शिक्षक ईश्वर भाईदास भदाणे आपल्या कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. चोरट्यांनी त्यांच्या घराला लक्ष्य केले आणि आत प्रवेश करण्याचा प्रयतक करत असतानाच सोनगीर पोलिसांचे गस्ती वाहन सायरन वाजवत गावात आले. पोलिसांच्या वाहनाचा आवाज ऐकताच चोरट्यांनी त्वरित पळ काढला, त्यामुळे ईश्वर भदाणे यांच्या घरातून कोणतीही वस्तू चोरीला गेली नाही. आज सकाळी ही घटना उघडकीस आली तेव्हा समोर आले की, चोरट्यांनी आणखी तीन घरांना देखील लक्ष्य केले होते. यात प्रकाश वेडू चिंचोले आणि सीआरपीएफमध्ये कार्यरत असलेले धनराज चुडामण भामरे यांच्या घरांचा समावेश आहे. धनराज (पान ४ वर)

## कंटेनरची दुचाकीला धडक; तरूण ठार

धुळे, दि.१२- शिरपूर तालुक्यातील सांगवी शिवारात नवी सांगवी बाजारपेठ येथून भरधाव वेगाने जाणाऱ्या कंटेनरने दुचाकीला धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वाराचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.सुरेश परशाराम थोरात यांनी दि. ११ मे रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, शिरपूर तालुक्यातील सांगवी येथील राहित दिनेश थोरात (वय २८) हा तरूण सांगवी ग्रामपंचायत कडे दि. ११ मे रोजी दुपारी सव्वा तीन वाजता काहितरी घेण्यात जात असतांना भरधाव वेगाने येणारे कंटेनर क्र. एचआर ५५/एजे-१५८६ ने जोरदार धडक दिल्याने रोहित थोरात याचा उजवा हात, डोके, कंबरेला गंभीर दुखापत होवून मृत्यू झाला.



## धुळ्यात घरफोडीच्या दोन घटना चोरट्यांकडून लाखोंची हातसफाई

**धुळे, दि.१२- शहरात चोरट्यांनी उच्छाद मांडला असून साक्री रोड परिसरातील जलगंगा व जलसिंचन सोसायटी या दोन ठिकाणी एकाच वेळी घरफोडी करून लाखोंचा मुद्देमाल सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.**

साक्री रोडवरील जलगंगा सोसायटी प्लॉट नं. ११४ येथे राहणारे श्रीकांत अशोक साळुंके हे महाफेड कंपनीत सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत असुन रात्री ते कर्तव्य बाजावण्यासाठी कंपनीत गेले तर कुटुंबातील इतर सदस्य विवाह सोहळ्यासाठी बाहेर गावी गेले. दुसऱ्या दिवशी घरी आल्यानंतर घराच्या कंपाऊंडच्या गेटला व मुख्य दरवाजाला असलेले कुलूप तुटलेल्याा स्थितीत दिसून आले. श्रीकांत साळुंके यांनी तत्काळ शहर पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यांच्या घरातून साडेबारा तोळ्याची सोन्याची पोत, पाच ग्रॅमची अंगठी, तीस भार चांदीचे गोट, सोन्याचे कानातले तसेच रोख रक्कम चोरून नेली. चोरी केलेल्या घराच्या काही अंतरावरील जलसिंचन सोसायटीतील प्लॉट नं.२१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग शहादा येथे नोकरीस असलेले दर्पण जितेंद्र पाटोळे हे राहतात. त्यांच्याकडे राहणारी त्यांची आई जवळच राहणाऱ्या भावाकडे रात्री (पान ४ वर)

## धुळे मनपा हद्दीतील गावांच्या विकासासाठी स्वतंत्र पॅकेजची आवश्यकता : माजी आ.कुणाल पाटील

**धुळे, दि.१२- धुळे महानगरपालिका हद्दीतील वलवाडी, महिंदळेसह दहा गावांच्या विकासासाठी स्वतंत्र पॅकेजची आवश्यकता आहे. विकासासाठी पॅकेज मिळावे म्हणून मी शासनाकडे वारंवार प्रयत्नही केले. म्हणून यापुढेही मनपा हद्दीतील गावांसह धुळे ग्रामीणच्या विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असून जनतेचे प्रश्न सुटावेत म्हणून संघर्ष करण्यासाठी मी तत्पर असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी वलवाडी येथे झालेल्या कार्यक्रमात केले.**




धुळे लोकसभा मतदारसंघाच्या खा.डॉ.शोभाताई बच्छाव यांच्या प्रयत्नातून वलवाडी येथील प्रभाग क्र.१ मध्ये नगरोत्थान योजना २०२४-२५ अंतर्गत बोरसे नगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरण करणे आणि खासदार स्थानिक विकास निधी २०२४-२५ अंतर्गत प्रभाग क्र.१ मध्ये चंद्रोदय कॉलनी येथे रस्ता कॉंक्रिटीकरण व बंदिस्त गटार करणे अशा एकूण ५५ लक्ष रु. कामांचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी खासदार डॉ.बच्छाव ह्या होत्या. चंद्रोदय कॉलनी, (पान ४ वर)

## महाराष्ट्र हरिजन सेवक संघ अध्यक्षपदी माजी आ.जोशी



मुंबई, दि.१२- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघ, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षपदी माजी आमदार, प्रदेश कॉंग्रेसचे उपाध्यक्ष मोहन जोशी यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. हरिजन सेवक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शंकर कुमार संन्याल यांनी मोहन जोशी यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच दिले. हरिजन सेवक संघाच्या वतीने आदिवासी भागात वसतीगृहे आणि शाळा चालविल्या जातात. तसेच ग्रामीण भागात गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा, अभ्यासिका (पान ४ वर)



## नंदुरबारमध्ये सत्तावीस लघु पाटबंधारे योजनांची दुरुस्ती करणार : गिते

**नंदुरबार, दि.१२ (प्रतिनिधी) - मृद व जलसंधारण विभागा अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात सुमारे ३५ वर्षापासून जुन्या असलेल्या एकूण २७ लघु पाटबंधारे योजनांची दुरुस्ती करुन व बंद पडलेल्या पारंपरिक कालव्या ऐवजी भूमिगत बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे शेतकऱ्याच्या शेतात पाणी देण्याची महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात येत असून, त्या जुन अखेर पूर्ण करून शेतकऱ्यांच्या शेतावर थेट पाणी पोहोचविणार असल्याची माहिती मृद व जलसंधारण विभागाचे नाशिक प्रादेशिक जलसंधारण अधिकारी इंजि. हरिभाऊ** (पान ४ वर)

## बुध्द पौर्णिमेपासून लळींगच्या जंगलात वन्य प्राण्यांची गणना सुरू : भागवत

**धुळे, दि.१२- बुध्द पौर्णिमेनिमित्त लळींगच्या संरक्षित जंगलात वन्य प्राण्यांची गणना होणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी निरनिराळया झाडा-झुडपांबरोबरच पशु-पक्षी आणि वन्य प्राणी देखील जोपासले पाहिजे. वन्य प्राण्याच्या संख्येत वाढ झाली की नाही, हे या गणनेतुन स्पष्ट होईल. गेल्या काही वर्षात लळींग कुरणात वन्य प्राण्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. गणनेच्या कामात सेवाभावी संस्थांच्या सदस्यांनी योगदान द्यावे, अशी अपेक्षा निसर्ग शोध संवर्धन संस्थेचे अध्यक्ष विनोद भागवत यांनी व्यक्त केली. लळींग कुरणात बुध्द पौर्णिमेपासुन वन्य प्राण्यांची गणना केली जाणार आहे, अशी माहिती भागवत यांनी दिली.**



धुळे शहरातील निसर्ग शोध संवर्धन संस्थेतर्फे दरवर्षी बुध्दपौर्णिमेच्या रात्री वन्य प्राण्यांची मोजदाद केली जाते. यंदाही वन्य प्राण्यांची गणना होत आहे. निसर्गाचा समतोल राखायचा असेल तर झाडा-झुडपांबरोबरच वन्य पशु-पक्षी आणि प्राणी वाढले पाहिजे, अशी भुमिका घेवुन काम केले जात आहे. पशुगणनेसाठी निरनिराळया सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी योगदान दयावे, अशी अपेक्षा संस्थेचे अध्यक्ष विनोद भागवत यांनी व्यक्त केली. भागवन यांच्या म्हणण्यानुसार, लळींग वनक्षेत्रात गेल्या वर्षी झालेल्या जनगणनेत रानडुकरे, रानटी ससे, बिबट्या, तरस, अजगर आढळुन आले आहेत. यंदाही वन्य प्राण्यांची मोजदाद करण्यासाठी बारा मेस सायंकाळपासुन (पान ४ वर)

## ड्रोन उडविणारा ताब्यात

मुंबई, दि.१२- भारत-पाकिस्तान दरम्यान तणावपुर्ण परिस्थिती पुर्ववत होत असताना पवई परिसरात ड्रोन उडविणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परवाना नसतानाही ड्रोन उडवल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पाकिस्तान तणाव दरम्यान ड्रोन हल्ले सुरू असताना देशभरातील अनेक भागात ड्रोन उडवण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -89,300 रु.+3% GST
सोने- 24 K -94,200 रु.+3% GST
चांदी- 99,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## देवपुरात दुभाजकावरील विद्युत रोहित्रास आग

**धुळे, दि.१२- शहरातील एस.एस.व्ही.पी.एस महाविद्यालयासमोरील विद्युत रोहित्राला रविवारी सायंकाळी अचानक आग लागली. शहरातुन जाणाऱ्या मुंबई-आग्रा महामार्गाच्या दुभाजकस्थळी हे विद्युत रोहित्र उभारण्यात आले आहे. रस्त्याच्या मध्यभागी आगीचे लोळ उठल्याने या रस्त्यावरील वाहतुक थांबविण्यात आली. तसेच रोहित्र जळाल्यामुळे या परिसरात दिर्घकाळ वीज पुरवठा खंडीत होता. आगीचे कारण कळु शकलेले नाही.**



धुळे शहर आणि परिसरात गेल्या दहा दिवसात ठिकठिकाणी अग्नीउपद्रवाच्या घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये एस.एस.व्ही.पी.एस महाविदयालयाजवळील विद्युत रोहित्राच्या आगीच्या घटनेचा समावेश झाला. रविवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास रस्त्याच्या दुभाजकस्थळी असलेले विद्युत रोहित्र अचानक पेटले. अवघ्या काही वेळात रोहित्रातील वायर आणि देखभालीसाठी साठवुण ठेवलेले ऑईल काही वेळातच पेटले. त्यामुळे आगीचे मोठे लोळ उठलेत. सर्वत्र धुर पसरला. त्यामुळे महामार्गावरील वाहतुक थांबविण्यात आली. काही काळानंतर आग आटोक्यात आली आणि रस्त्यावरील वाहतुक सुरळीत झाली. रोहित्र जळाल्यामुळे या परिसरातील विज पुरवठा दिर्घकाळ खंडीत होता. रोहित्राला आग का लागली हे मात्र स्पष्ट होवु शकलेले नाही. अग्निशमन दलाने पाण्याचा मारा करुन आग आटोक्यात आणली.

## धुळ्यात कदमबांडे लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा

शिरपूर, दि.१२- एकोणाविस वर्षाखालील राजमाता स्वर्गीय पदमाराजे कदमबांडे लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन धुळे जिल्हा क्रिकेट असोशियन तर्फे करण्यात आले आहे. सदर स्पर्धा ही वरखेडी कुंडाणे मधील (एम. सी.ए.) च्या मैदानावर घेण्यात येणार आहे. सदर स्पर्धा ही ४०-४० षटकांच्या बाद पद्धतीत घेण्यात येणार आहे. तसेच सदर सामन्यात सेमी फायनल दोन दिवसाचा फायनल सामना तीन दिवसाचा घेण्यात येणार आहे. तसेच फायनल मॅचचा सामनावीर पुरस्कार १ हजार रुपये व चषक देण्यात येईल. तसेच उत्कृष्ट फलंदाज १ हजार रुपये व चषक, गोलंदाज १ हजार (पान ४ वर)

# विज वितरणचे अधिकारी कर्मचारी प्रलंबित मागण्यांसाठी संप पुकारणार

धुळे, दि.१२- महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते अधिकारी कृती समितीच्यावतीने तीन पत्र दिल्यानंतरही शासन व व्यवस्थापनाने कृती समितीने दिलेल्या पत्राकडे दुर्लक्ष केले. प्रलंबित मागण्यांच्या पुर्ततेसाठी दि.२० मे रोजी संप पुकारण्यात येणार आहे. भाकपतर्फे शिरपूरला बैठक घेण्यात आली. या बैठकीत संपाचा निर्णय घेण्यात आला. संप यशस्वी करण्यासाठी सहभागी होण्याचे आवाहन कॉ. नाना पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कंपनीचे अपर मुख्य सचिव व उर्जा, व्यवस्थापकीय संचालक आभा शुक्ला, तसेच अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक निर्मिती पारेषण वितरण कंपनी यांना तीन वेळा विविध मागण्यांसंदर्भात पत्र देण्यात आले आहेत. विविध मागण्यांमध्ये राज्यातील तीनही विज कंपन्यांमध्ये कंत्राटीकरण, खाजगीकरणाला विरोध आहे. महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्रे खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देण्यास तीव्र विरोध आहे. तीनही विज कंपन्यांमध्ये मागासवर्गीय अनुशेषासह भरून काढण्याचा कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा. २०१९ च्या पगारवाढ करारा पुर्वीनंतर प्रलंबित असलेल्या प्रश्नावर कमिटीचे गठन करून निकाली काढणे, तीन्ही विज कंपन्यातील बेचाळीस हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम कामगाराची योग्य वेतनश्रेणी व दर्जा देण्याबाबत निर्णय देणे. यांसारख्या अनेक मागण्यांचा समावेश आहे. यांसाठी संघटनेचे कृती समितीचे पदाधिकारी धुळे, जळगाव, नंदुरबार येथे प्रचार करत आहे. शिरपूर येथे घेण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी कॉ.नाना पाटील, कॉ.हिरालाल परदेशी, संतोष पाटील, साहेबराव पाटील, अर्जुनराव कोळी, बुधामाला पवार, सतिलाल पावरा, कॉ.शिवाजीराव पाटील, कॉ.वसंतराव पाटील, कॉ. पोपपटराव चौधरी, कॉ.जितेंद्र माळी व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच इतर बँका, खाजगी पतसंस्था, तथा सर्व प्रकारच्या वित्तीय संस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

तु.जि. धुळे पो. तु. ता.धुळे पैकी मौजे धुळे महानगरपालिका हद्दीतील मौजे धुळे येथील सि.स. नं. ९०६२ पैकी प्लॉट नं. ४४ सत्ता प्रकार क असलेली एकूण क्षेत्र २००चौ.मी. (२१५३ चौ. फुट) बखळ प्लॉट मिळकत यासी चतु:सिमा प्लॅन लेआऊट प्रमाणे, येणे प्रमाणे चतु:सिमांकीत बखळ प्लॉट मिळकत व त्यात असलेल्या तळ, माती, जमीन, दगड वगैरे अगंभूत व तदंगभुत व विधिनिक्षेप भुसंलग्न वस्तुंसह तथा त्यात असलेला पाणी पुरवठा व विजपुरवठा यांचेसहची मिळकत कायमस्वरुपी खरेदीखताने खरेदी करण्याचा सौदा आमचे पक्षकार यांनी सुभाष भिकुलाल जयस्वाल रा. धुळे यांचेशी केलेला आहे. नमूद मिळकत आमचे पक्षकार लवकरच खरेदी करण्याच्या विचारात आहेत. तरी नमूद मिळकतीच्या अनुषंगाने कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, लिज. बोजा, संच, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा अधिकार असल्यास त्यांनी नमूद नोटीस मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत वैध दस्तऐवजांसह आमचे वरील नमूद पत्त्यावर प्रत्यक्ष येवून वैध दस्तऐवज आम्हास दाखवून त्याबाबत खात्री पटवून लेखी हरकत घ्यावी. अन्यथा सदरील मिळकत निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून त्याबाबतचा व्यवहार आमचे पक्षकार पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या कोणत्याही हकरतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. परस्पर लेखी स्वरूपात प्रसिद्ध केलली जाहीर हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदरची जाहीर नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन व दिलेल्या अधिकारावरुन त्यांचे वतीने दिली असे. धुळे.

दिनांक : १२/०५/२०२५

**ॲड.सिद्धार्थ ए.बालीया**

रा. जिल्हा न्यायालय, धुळे

मो.९३७१३९०९००

(पान २ वरुन) अशी अवस्था सध्या निर्माण झालेली असून या संधीची वाट अनेक जण बघत आहेत. ती संधी लवकरच त्यांना प्राप्त होईल. ज्याप्रमाणे भारत पाकिस्तान युद्धाच्या सावटाखाली राज्यकर्त्यांनी सगळे प्रश्न बाजूला टाकले. खुशमस्कऱ्यांनी देखील तेच केले. आणि देशाचा प्रश्न भावनिक पातळीवर आणून त्याची चर्चा जोरदार सुरू केली.

# बातमी मागची बातमी दुर्लक्षित

जेणेकरून लोक अन्नधान्य आणि अन्य जीवनावश्यक वस्तूत झालेली भाव वाढ, नोकऱ्या, रोजगार, अन्य विकास योजना, शेतीचे प्रश्न, शेतमालाचे प्रश्न विसरून जावेत. तेच नेमके घडले. या प्रश्नांच्या ऐवजी लोकांना भावनिक अस्मितेचा मुद्दा मोठा वाटू लागला. तीच बाब आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुढे येणार आहे. यासाठी ह्या संस्था आहेत ते प्रश्न नावापुरते कागदावर दाखविले जातील. प्रत्यक्षात मात्र लोकांकडे जाताना धर्म संकटात आल्याचा बागुल बुवा उभा करण्यात येईल. त्या थापेबाजीला भूलून आणि मताची किंमत मोजून घेऊन नको असलेल्या तथाकथित सेवकांना निवडून देतील. मुळात लोकांनी त्यांची अस्मिता नकली पुढाऱ्यांकडे गहाण ठेवलेली आहे. या अवस्थेतून जोपर्यंत समाज बाहेर पडत नाही तोपर्यंत शहरातील बकालपणा, गुंडगिरी, बेशिस्त, असुविधा, लाचारी, हे सगळे सहन करावेच लागणार आहे. थोडे वातावरण निवळले की, सहन करण्याची ताकद आपल्याला वाढवावी लागेल.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मौजे धुळे येथील सि. स. नं. ३५४२/१ड चे क्षेत्र ३४६.६४ चौ. मी. यातील कांकरिया टॉवर मधील दुसऱ्या मजल्यावरील.

१) फ्लॅट नं. एस. ई ६ चे क्षेत्र ६३.०५ चौ. मी. बिल्टअप एरिया यासी षट:सिमा –

| | |
|---|---|
| पुर्व : लागून बोळ रस्ता, | पश्चिम : सदनिका नं.एस.डब्ल्यू. ०५ चा भाग |
| दक्षिण : साक्री रोड | उत्तर : पॅसेज व सदनिका नं. एन. ई. ०८ |
| वर : टेरेस | खाली : सदनिका नं. एस. ई. ०४ |

२) फ्लॅट नं. एस.डब्ल्यू. ५ पैकी पूर्व भाग चे क्षेत्र २० चौ. मी. बिल्टअप एरिया यासी षट:सिमा–

| | |
|---|---|
| पुर्व : सदनिका नं. एस. ई. ०६, | पश्चिम : सदनिका नं.एस.डब्ल्यू. ०५ चा भाग |
| दक्षिण : साक्री रोड | उत्तर : पॅसेज |
| वर : टेरेस | खाली : सदनिका नं. एस. डब्ल्यू. ०१ चा भाग |

येणे प्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक डॉ. **नारायण चंद्रमल गलाणी** रा.स्वामी पद्मनाभ नगर, साक्री रोड, यांचेशी कायम खरेदी करणेचा सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे आशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. धुळे दि.११/०५/२०२५

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**

ब्लॉक नं.आर/२,रुम नं.१, कुमारनगर, साक्री रोड,धुळे.

मो.९९२२८२८८८३, ७४९९९९८९५५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना, सरकारी निम सरकारी कार्यालय वगैरे यांना आमचे अशिलांनी दिलेल्या कागदपत्रांवरुन व अधिकारावरुन **ॲड. राहुल रमेश वाघ** यांचे मार्फत जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे महिंदळे ता. धुळे जिल्हा धुळे येथील गट क्रमांक ९९/२ मधील एकूण क्षेत्र ४ हे. २९ आर. पैकी जिरायत २.९५ हे. व पोट खराब (अ) १.३४ हे. या शेतजमिनीचे मालकी हक्क **सौ. निशा मनोज अग्रवाल व सौ. पदमा राजेंद्र अग्रवाल** यांच्याकडे सामाईक मालकी स्वरुपात आहेत.

सदर शेतजमिनीच्या बाबतीत वरील मालकांनी त्यांचा हिस्सा खरेदीदाराकडे विक्री करण्याचा सौदा केला असून नोटीसीतील खरेदीदाराकडून व्यवहार करण्यात येणार आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणालाही कोणत्याही प्रकारचा विवाद, अडचण, वाद, खरेदी –विक्री व्यवहार, टांच, बक्षिस, मुख्तारपत्र, बोजा, लिज, गहाण, सोडचिठ्ठी, करार, इत्यादी कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पुराव्यांसह लेखी स्वरुपात लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी.

तोंडी हरकती किंवा अशा प्रकारच्या वादासाठी देण्यात आलेल्या तक्रारी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.नमूद मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. यानंतर होणाऱ्या व्यवहारासंबंधी आमचे पक्षकार खरेदीदार पूर्णपणे उत्तरदायित्व स्वीकारणार नाहीत.

**ॲड.राहुल रमेश वाघ,** मो.नं.९८५०६३४२६४

ऑफिस : नं. १७, आण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्स फाशी पुल, धुळे

## ''शिर्षक सत्यापन सूचना नोटीस''

**प्रति,**

तमाम जनतेस, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व विशेषतः बांधकाम ठेकेदारांना (गवंडी) व हितसंबंधीतांना आमचे पक्षकार नामे १) शेख बशीर शेख अहमद २) मुमताजबी बशीर शेख ३) रुबीनाबी नासिर शेख ४) नाविद शेख नासिर शेख ५) साबीर शेख बशीर शेख ६) शेख अलताफ शेख बशीर ७) शाहिस्ताबी शेख अलताफ सर्व रा.घर नं.४४१९, गल्ली नं.१, नुरानी मशिद जवळ, लाला सरदार नगर, देवपूर, धुळे यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे पक्षकार नामे शेख बशीर शेख अहमद यांचा मुलगा नामे नासिर बशीर शेख रा. घर नं.४४१९, गल्ली नं.१, नुरानी मशिद जवळ, लाला सरदार नगर, देवपूर, धुळे हा मिस्तरी कामे व बांधकामाची ठेके घेत होता. परंतु त्याची सन २०१५ पासून ते आजपावेतो मानसिक स्थिती खराब झाल्यामुळे धुळे येथे मनोविकार तज्ञ डॉक्टर गौतम शाह यांच्याकडे औषधोपचार चालु आहे. व त्याला गोळया घेतल्या तरच बरे वाटते. व गोळया न घेतल्यास तो विचित्र वागतो याचा गैरफायदा घेवून काही विघ्नसंतोषी बांधकाम ठेकेदार अथवा गवंडी नासिर बशीर शेख याच्या नावावर नवीन बांधकामाचे ठेके घेतात व त्याच्या नावावर करारनामे करुन लोकांकडून मोठ मोठया रकमा अॅडव्हॉन्स म्हणून स्विकारतात. व पुढे बांधकाम पूर्ण करीत नाहीत. बांधकाम अर्थवट सोडून देतात. त्यामुळे ज्या लोकांचे कामे पूर्ण झालेले नाहीत ते लोक आमचे वरील पक्षकाराच्या घरी येवून नासिर बशीर शेख याच्याविषयी तक्रारी करुन व त्याच्याकडून करुन घेतलेल्या करारानाम्याचे पैसे परत मागण्यासाठी तगादा लावतात व वादविवाद उपस्थित करतात. त्यावेळी आमचे पक्षकारांना माहिती होते की, काही बांधकाम ठेकेदार अथवा गवंडी नासिर बशीर शेख याच्या आजाराचा गैरफायदा घेवून चुकीचे व्यवहार करतात. त्यामुळे आमचे पक्षकारांच्या घरातील सर्व सदस्यांना नाहक मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे नासिर बशीर शेख याला कुणीही कुठल्याहीप्रकारे बांधकामाचे ठेके अथवा बांधकाम करण्यासाठी देवू नये. नासिर बशीर शेख याने कुठल्याही मिळकतीचे अथवा दागिने दाखवून हातऊसनवार रकमा अथवा व्याजाने पैसे मागितल्यास देवू नये अथवा कुठल्याहीप्रकारे आर्थिक व्यवहार करु नये. याउपरोक्त कोणीही त्याच्याशी व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे वरील सर्व पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही. येणेप्रमाणे शिर्षक सत्यापन सूचना नोटीस असे. **धुळे, दिनांक–१२/०५/२०२५**

**ॲड.पुरुषोत्तम श्रावण महाजन**

ऑफिस– बागुल संकुल, गाळा नं.जी/९, दत्तमंदीर, देवपूर, धुळे–४२४००५.

मो.नं.९८२३२१५४४०

## जाहीर नोटीस

नि. ६/ड

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (ज्युनी. डिव्ही.) यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५२४/ २०२५

खुमसिंग कुत्र्या पावरा, रा. हाडाखेड ता. शिरपूर जि. धुळे....अर्जदार

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी अर्जदार **खुमसिंग कुत्र्या पावरा** यांनी मे. न्यायालयात नामे कुत्र्या मंणश्या पावरा हे दि. ०३/०६/१९९० रोजी मौजे हाडाखेड ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर एकमेव वारस असल्याबाबत अर्जदार याने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ अन्वये कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे करीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना कळविण्यात येते की, नामे कुत्र्या मंणश्या पावरा यांचे वारसांबाबत वर नमूद अर्जास कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास दि. २३/६/२०२५ रोजी ठिक १०.३० वाजता मे. न्यायालयात हजर होवून लेखी तक्रार सादर करावे तसे न केल्यास अर्जदार यांचा अर्ज मंजूर करुन अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आदेशावरुन

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. नं. ६/ड

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डि.) यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५४२/ २०२५

**१) श्रीमती पार्वती रमेश पावरा २) आशिल रमेश पावरा**

**३) सिताराम रमेश पावरा, ४) कार्तिक रमेश पावरा**

**५) रोशनी रमेश पावरा,** सर्व रा.अजंदे बु.ता.शिरपूर जि.धुळे ....अर्जदार

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत **रमेश परशुराम पावरा** हे दि. ०९/१२/२०२४ रोजी मौजे अजंदे बुा. ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून अर्जदार नं. १ ते ५ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २४/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/ आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. ०८/०५/२०२५

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डि.) यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५४३/ २०२५

**१) परसी जुगराम उर्फ जगीराम पावरा २) भाऊ जगीराम पावरा**

**३) शांतीराम जगीराम पावरा,**

सर्व रा.सांगवी ता.शिरपूर जि.धुळे ....अर्जदार

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत **जगीराम खेमाल पावरा** हे दि. ०१/०७/२०२१ रोजी मौजे सांगवी ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झालेले असून अर्जदार नं. १ ते ३ यांना शासकीय व निम–शासकीय कामांसाठी व अर्जदार नं. १ ते ३ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २१/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल. दि. ०८/०५/२०२५

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ६

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. (ज्यु. डि.) यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५३७/ २०२५

**१) संगिता शालिक माळी, २) संदीप शालिक देवरे**

**३) राहुल शालिक देवरे, ४) अजय शालिक देवरे ....अर्जदार**

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. शालिक सोमा माळी हे मौजे महादेव मंदिरजवळ वरवाडे शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २१/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ०८/०५/२०२५

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. नं. ६

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५१३/ २०२५

**१) काशिनाथ दामू कलाल, २) संतोष काशिनाथ कलाल,**

**३) प्रकाश काशिनाथ कलाल, ४) कोमल नरहरी जावरे ....अर्जदार**

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत **कै. वत्सलाबाई काशिनाथ कलाल** ह्या रा. कळमसरे ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १७/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.दि. १२/०५/२०२५

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. नं. ६/ड

शिरपूर येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात

दिवाणी कि. अर्ज नं.५३९/ २०२५

१)रामेश्वर विठ्ठल कोळी, २) शोभाबाई पुंडलिक देवरे

३) रत्नाबाई अशोक कोळी, ४) रंजना कैलास कोळी

५) सुकदेव विठ्ठल कोळी, ६) खटूबाई विठ्ठल कोळी ....अर्जदार

।।विरुध्द।।

कोणीही नाही .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत कै. विठ्ठल धाकू कोळी हे रा. थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबंधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. २४/०६/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येवून, अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल.

दि. ०८/०५/२०२५

सही:... सही...

**कनिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय, शिरपूर जि. धुळे — (कोर्टाचा शिक्का) — **सहा. अधिक्षक** दिवाणी न्यायालय शिरपूर जि. धुळे

## नमुना इ-४ (नियम १९ पहा)

मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (व्यवस्थापक समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर केलेल्या खालील तक्त्यातील सहकारी संस्थेचा निवडणूक कार्यक्रम नियम १९ अन्वये खालील परिशिष्टाप्रमाणे जाहीररित्या प्रसिध्द करीत आहे.

| अ. क्र. | तालुका | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे नाव व भ्रमनध्वनी क्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | शिंदखेडा | स्वा.सै.टोणगावकर मध्यवर्ती सहकारी ग्राहम भांडार लि.दोंडाईचा, ता.शिंदखेडा, जि.धुळे | श्री.सागर दांडगे ८९०८४४७४७३ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शिंदखेडा यांचे कार्यालय, प्रशासकीय संकुल, तहसिल आवार, पहिला मजला, शिंदखेडा, जि.धुळे |
| २ | धुळे | शिरूड विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. ता.जि.धुळे | श्री.अमोल यंडाईत ८२७५५९१७७७ | उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका यांचे कार्यालय, प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे |
| ३ | धुळे | बोदगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. ता.जि.धुळे | श्री.योगेश पाटील ८१०८४४७४७३ | |
| ४ | धुळे | मोघण विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. ता.जि.धुळे | श्री.सरला गोस्वामी ८००७०३३१३३ | |
| ५ | धुळे | दहयाणे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. ता.जि.धुळे | श्री.नागेश पुकळे ९५५२८३७९१५ | |

### अ.क्र.१ मधील संस्थेसाठी निवडणूक कार्यक्रमाचे परिशिष्ट

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्र मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्राची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मत मोजणीची दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | सर्वसाधारण व्यक्तीगत सभासदातून | ०८ | दिनांक १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | जसजशी प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक २०/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून (निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय यांचे कार्यालयात) | दिनांक २१/०५/२०२५ दुपारी १२.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | दिनांक २१/०५/२०२५ ते ०४/०६/२०२५ स.११.०० ते दु.३.०० वाजे पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक ०५/०६/२०२५ स.११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | दिनांक १५/०६/२०२५ स.८.०० वा. ते दुपारी ४.०० वा. (स्थळ नंतर घोषीत करणेत येईल.) | दिनांक १५/०६/२०२५ मतदान संपल्यानंतर ते मतमोजणी संपेपर्यंत (स्थळ नंतर घोषित करणेत येईल.) | दिनांक १५/०६/२०२५ मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेचच घोषित करण्यात येईल. |
| २ | इतर मागास वर्गीय | ०१ | | | | | | | | | |
| ३ | अनुसूचित जाती/जमाती | ०१ | | | | | | | | | |
| ४ | भटक्या विमुक्त जाती–जमाती | ०१ | | | | | | | | | |
| ५ | सहकारी संस्था | ०२ | | | | | | | | | |
| ६ | महिला प्रतिनिधी | ०२ | | | | | | | | | |
| | **एकूण** | **१५** | | | | | | | | | |

### अ.क्र.२ ते ५ मधील संस्थेसाठी निवडणूक कार्यक्रमाचे परिशिष्ट

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्र मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची यादीचे प्रकाशन | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक | विधीग्राहय नामनिर्देशन पत्राची सूची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक | उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादीचे प्रकाशन | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मत मोजणीची दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषीत करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | (अ.क्र.२ मधील संस्थासाठी) | | (अ.क्र.२ व ३ मधील संस्थांसाठी) | जसजशी प्राप्त प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | (अ.क्र.२ व ३ मधील संस्थांसाठी) | | | | | | |
| १ | सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | १० | दिनांक १३/०५/२०२५ ते १९/०५/२०२५ | | दिनांक २०/०५/२०२५ | दिनांक २१/०५/२०२५ | दिनांक २१/०५/२०२५ ते ०४/०६/२०२५ | दिनांक ०५/०६/२०२५ | १४/०६/२०२५ | १४/०६/२०२५ | १४/०६/२०२५ |
| २ | अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी | ०१ | | | | | | | (अ.क्र.३ मधील संस्थांसाठी दिनांक) | | |
| ३ | महिला प्रतिनिधी | ०२ | | | | | | | १५/०६/२०२५ | १५/०६/२०२५ | १५/०६/२०२५ |
| ४ | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | ०१ | (अ.क्र.४ मधील संस्थांसाठी) | | (अ.क्र.४ मधील संस्थांसाठी) | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती/जमाती/ विशेष मागास प्रवर्ग | ०१ | | | दिनांक २१/०५/२०२५ | दिनांक २२/०५/२०२५ | दिनांक २२/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ | दिनांक ०६/०६/२०२५ | २०/०६/२०२५ | २०/०६/२०२५ | २०/०६/२०२५ |
| | **एकूण** | **१५** | दिनांक १४/०५/२०२५ ते २०/०५/२०२५ | | | | | | | | |
| | (अ.क्र.३ ते ५ मधील संस्थासाठी) | | (अ.क्र.५ मधील संस्थांसाठी) | | (अ.क्र.५ मधील संस्थांसाठी) | | | | | | |
| १ | सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी | ०८ | दिनांक २७/०५/२०२५ ते ०२/०६/२०२५ | | दिनांक ०३/०६/२०२५ | दिनांक ०४/०६/२०२५ | दिनांक ०४/०६/२०२५ ते १८/०६/२०२५ | दिनांक १९/०६/२०२५ | २९/०६/२०२५ | २९/०६/२०२५ | २९/०६/२०२५ |
| २ | अनुसुचित जाती/जमाती प्रतिनिधी | ०१ | | | | | | | | | |
| ३ | महला प्रतिनिधी | ०२ | | | | | | | | | |
| ४ | इतर मागासवर्गीय प्रतिनिधी | ०१ | अ.क्र.२ ते ५ मधील संस्थांसाठी स्थळ व वेळ | | | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती/ जमाती/विशेष मागास प्रवर्ग | ०१ | सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | | रोजी दुपारी १२.०० वाजेपासून (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दुपारी १२.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | स.११.०० ते दु.३.०० वाजे पर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | स.११.०० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व संस्था नोटीस बोर्ड) | स.८.०० वा. ते दुपारी ४.०० वा. (स्थळ नंतर घोषीत करणेत येईल.) | मतदान संपल्यानंतर ते मतमोजणी संपेपर्यंत (स्थळ नंतर घोषीत करणेत येईल.) | मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर लगेचच घोषित करण्यात येईल. |
| | **एकूण** | **१३** | | | | | | | | | |

टिप :- १) स्तंभ क्र.६ व ८ मध्ये विनिर्दिषट केलेली यादी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात व संबंधीत संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २) मतदार यादी संस्थेच्या कार्यालयामध्ये विकत मिळू शकतील. ३) नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेल्या चिन्हाच्या यादीमधून चिन्हे निवडावयाचे आहे. ४) निवडणूक चिन्हांचे वाटप स्तंभ ८ मधील तारखेस व ठिकाणी सकाळी ११.०० वाजता करणेत येईल. ५) मतदान व मतमोजणीचे दिवस वगळून निवडणूक कामकाज शासकीय/सार्वजनिक सुट्या वगळून राहील.

सहीत/-

(मनोज चौधरी)

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,

तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे

पान १ वरुन

## महाराष्ट्र सरकार आता संरक्षण..

चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय सैन्याने ज्या ताकदीने आणि अचूकपणे ऑपरेशन सिंदूर राबवले, ते अभूतपूर्व आहे. संरक्षण दलाला मी सॅल्यूट करतो. मुंबईसारखे शहर हे अतिशय महत्त्वपूर्ण आहे. भारताची आर्थिक राजधानी आहे. यापुर्वी मुंबईवर हल्ले झाले तेव्हा शत्रूकडून आम्ही भारताच्या आर्थिक राजधानीवर हल्ला केला हे दाखवण्याचा प्रयत्न झाला. येणाऱ्या काळात संपूर्ण ताकदीने काम करावे लागेल. या स्थितीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. सायबर सुरक्षेबाबत सर्वांनाच अधिक काळजी घ्यावी लागेल. राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी आणि संरक्षण दलाचे अधिकारी मिळून अधिक समन्वयाने एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री सचिवालयातील सचिव, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, राज्यातील आपत्ती व्यवस्थापनच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी, तसेच मुंबई जिल्हा आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी आणि इतर विभागांचे अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

## दहावी निकाल आज दुपारी जाहीर होणार

शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च मध्ये दहावीची परिक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर १३ मेस दुपारी एकला ऑनलाईन जाहीर करण्यात येत असल्याचे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.
htt{r://rerultr.digilobker.gov.in
htt{r://rrbrerult.mahahrrbboard.in
htt{://rrbrerult.mkbl.org
htt{r://rerultr.targev{rblibationr.org

## शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी..

पुरवठा होणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण म्हणून शेतकऱ्यांना पीक विम्याबाबत मार्गदर्शन करावे. शिवाय शेतकऱ्यांच्या लाभाच्या विविध योजना शासन राबवित आहेत. या योजनांची माहिती शेतकऱ्यांना द्यावी.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी जगताप यांनी खरीप हंगामासाठी एकूण २६ हजार ९१३ क्विंटल विविध पिकाचे व ११ लाख कापूस बियाण्याची पाकीटांची मागणी कृषि आयुक्तालयाकडे करण्यात आली आहे. यामध्ये महाबिजकडून कापूस वगळता २ हजार १५० क्विंटल विविध पिकांचे बियाणे व खाजगी कंपनीमार्फत २४ हजार ७६३ क्विंटल बियाण्याचा समावेश आहे. जिल्ह्यासाठी खरीप हंगामासाठी १.४५२ लाख मे.टन रासायनिक खताची मागणी करण्यात आली आहे. पैकी १.०७२ लाख मे.टन खताचे आवंटन कृषि आयुक्तालयाने जिल्ह्यासाठी मंजूर केले आहे. कृषि निविष्ठांचे गुणवत्ता नियंत्रणासाठी ५ भरारी पथके कार्यरीत करण्यात आले असून १६ गुणवत्ता निरिक्षकांमार्फत जिल्हास्तरावर सनियंत्रण करण्यात येणार आहे. सन २०२५-२६ मध्ये एकात्मीक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ९४ कांदाचाळ तसेच २५ शेडनेट हाऊस, १३ सामुहीक शेततळे, ९ पॅक हाऊस, ५६ मिनी टॅक्टर, कृषि यांत्रिकीकरण योजनेतंर्गत महाडीबीटी प्रणालीवर २५० ट्रॅक्टर, ३५० रोटाव्हेटर, १०० थ्रेशर, १५० पल्टीनांगर, १५ कल्टीव्हेटर व १५० इतर औजारे या बाबींचा लाभ देण्याचे प्रस्तावीत आहे. अशी माहिती त्यांनी सादरीकरणात दिली. यावेळी कर्ज वितरण, कृषि विद्युत जोडणी, पशुसंवर्धन विभाग, दुग्ध विकास विभागाचा आढावा घेण्यात आला.

यावेळी पालकमंत्री श्री.रावल यांच्या हस्ते कृषि विभागामार्फत तक्रार दाखल करण्यासाठी निवारण कक्ष तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांची माहिती व अपडेट देण्यासाठी व्हॉटस्प क्युआर कोडचे अनावरण तसेच पी.एम. किसान योजनेच्या भित्तीपत्रकाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## जिल्ह्यात बौध्द पौर्णिमेनिमित्त उपक्रम

बुध्दांची जयंती आणि बुध्द पौर्णिमेचे औचित्य साधुन जिल्हयात सर्वत्र कार्यक्रम झाले. धुळे शहरातील पुरोगामी विचार मंच आणि संविधान संरक्षण समितीच्या पदाधिका-यांनी डॉ.आंबेडकर पुतळा चौकात कार्यक्रम घेतला. या ठिकाणी डॉ.आंबेडकरांच्या पुतळयास आणि भगवान गौतम बुध्दांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. आज निर्माण झालेली परिस्थिती पाहता, भगवान गौतम बुध्दांनी दिलेले शिकवण महत्वपुर्ण आहे. बुध्दांच्या शिकवणीतुन युध्द नको बुध्द हवा, अशी जाणीव होते. त्यामुळे प्रत्येकाने भगवान गौतम बुध्दांची शिकवण अंगीकारावी आणि प्रगत होण्याचा प्रयतक करावा, अशी भावना या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. यावेळी संविधान संरक्षण समितीचे प्रमुख हरिश्चंद्र लोंढे, पुरोगामी विचार मंचचे प्राध्यापक मनोहर हातेकर, कम्युनिस्ट पक्षाचे एल. आर. राव, समाजवादी पक्षाचे गो.पी. लांडगे, दिपकुमार साळवे, राजेंद्र धोडरे, पी.टी. बेडसे, मनोहर मोहीते, बबनराव वानखडे, पंडित गोसावी, संजय अहिरे, दीपक सोनवणे, छोटूलाल मोरे, रामकृष्ण शिंदे, धनंजय गाळणकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**शालेय साहित्य वितरण**

शिंदखेडा येथील राजरत्न सामाजिक, शैक्षणिक संस्थेतर्फे बौद्ध पौणिमेचे औचित्य साधुन गरजु विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. शिंदखेडयातील डॉ.आंबेडकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात भगवान गौतम बुध्द आणि डॉ. आंबेडकरांच्या पुतळयाचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गरजवंत शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरीत करण्यात आले. शिक्षणाचे महत्व बाबासाहेबांनी कधीच सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येकाने शिक्षण घेवुन प्रगत व्हावे, अशी भावना या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली. यावेळी पोलिस निरीक्षक बाळासाहेब थोरात, सुनिल चौधरी, माजी नगरसेवक राजु थोरात, प्रा.राहुल महिरे, प्रा.भैय्या मंगळे, संजय धिवरे, संतोष कापुरे, प्रा.अजय बोरदे, जितेंद्र मेखे, यादव सावंत, दत्तात्रय धिवरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात जवळपास शंभर विदयार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष भुषण नगराळे, उपाध्यक्ष कमलेश पाटोळे, सचिव सागर थोरात, सदस्य ज्ञानेश्वर पाटोळे, चंद्रकांत नगराळे यांनी परिश्रम घेतले.

## चार ठिकाणी चोऱ्यांचा प्रयत्न

भामरे हे सध्या पुण्याला असल्याने त्यांचे घर बंद असते. याव्यतिरिक्त, एका वृद्ध महिलेच्या घरीही चोरीचा प्रयत्न झाला. सुदैवाने या चारही घरांमध्ये चोरट्यांच्या हाती काहीच लागले नाही. सोनगीर पोलिसांनी दाखवलेल्या या सतर्कतेमुळे मेहेरगावातील नागरिकांचे मोठे नुकसान टळले आहे. ग्रामस्थांनी पोलिसांच्या या तत्परतेचे कौतुक केले असून, यामुळे गावात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. खेड्यांवर वाढत्या घरफोडीच्या घटना घडत असल्यामुळे सोनगीर पोलीस रात्री हद्दीतील खेड्यांवर नियमित गस्त घालत आहेत. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

## साक्रीत तिंरगा प्रतिकृतीची रॅली

स्टॅंड, संतोषी माता मंदिर, बाजारपेठ, ओम शांती रोड मार्गावर रॅलीचे स्वागत झाले. रॅलीत सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, नागरिक, विद्यार्थी, महिला आणि तरुणांनी सहभाग नोंदविला. प्रत्येकाने हाती तिरंगा होता घेवुन भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. या घोषणांमुळे संपुर्ण साक्री शहरात देशभ्नतीमय वातावरणाची निर्मिती झाली होती.

पान १ वरुन

## एकसंघ राहणे हीच खरी ताकद

लागला. भारतीय सैन्याला आम्ही मुभा दिली. त्यानंतर भारतीय सैन्यदलाच्या तिन्ही विभागांनी केलेली कामगिरी अभिमान वाटावी अशीच आहे. ऑपरेशन सिंदूर हे केवळ मोहिमेचे नाव नसून कोट्यावधी भारतीयांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे. या देशातील बहिणी आणि मुलींच्या कपाळावरील कुंकू पुसण्याचे क्रौर्य करणाऱ्या दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी या देशातील प्रत्येक नागरिक, समाज, राजकीय पक्ष एकसंघ झाले. त्यामुळेच आपण पोलादी निर्णय घेऊ शकलो. पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची प्रशिक्षण केंद्रे, विमानतळे यांच्यावर तीव्र हल्ला करीत शंभरावर दहशतवादी ठार केले. भारताच्या कारवाईमुळे केवळ दहशतवाद्यांना जोपासणाऱ्या इमारतींच्या भिंतीच नाही तर दहशतवादी आणि त्यांना आश्रय देणाऱ्यांचे मनोधैर्य हादरले आहे. आता पाकिस्तान संयमाची भाषा करीत आहे.

**युध्दाचे नाही आणि दहशतवादाचे युग नाही**

ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाच्या विरोधातील भारताचे धोरण आहे, हे सर्वांनी लक्षात घ्यावे, असे नमूद करून पंतप्रधान मोदी म्हणाले, आता आम्ही दहशतवादाचे जेथे मुळ आहे तेथे हल्ला करणार. दहशतवाद्यांनी आमच्या सीमारेषेवर हल्ला केला. पण, आपल्या सैन्याने त्यांच्या छातीवर हल्ला केला आहे. अणवस्थाची भिती दाखवून दहशतवाद जोपासणाऱ्यांची आम्ही गय करणार नाही. दहशतवादी पुरस्कृत सरकार आणि दहशतवाद्यांच्या आश्रयदात्यांवर सक्त कारवाई केली जाणार. सध्याचे युग हे युध्दाचे युग नाही हे मान्य आहे. पण, हे युग दहशतवादाचे नाही, हे देखील ठामपणे सांगण्याची वेळ आली आहे. दहशतवाद जोपासताना संवादाचा प्रयत्न करणे, दहशतवाद जोपासताना व्यापाराची अपेक्षा ठेवणे, हे कधीच सहन केले जाणार नाही. आज बुध्दपौर्णिमा आहे. भगवान बुध्दांनी जगाला शांतीचा संदश दिला आहे. पण, त्याचा अंगीकार प्रत्येक घटकाने करणे गरजेचे आहे. आम्ही आमच्या सैन्यातील पायदळ, वायुसेना आणि नौदलास सतत सतर्क ठेवणार आहोत, याचे भान दहशतवाद जोपासणाऱ्यांनी ठेवावे, असा इशाराही पंतप्रधान मोदी यांनी दिला.

## धुळे मनपा हद्दीतील गावांच्या विकासासाठी..

गोंदूर विमानतळ रोड, वलवाडी धुळे येथे झालेल्या कार्यक्रमात बोलताना काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी सांगितले की, वलवाडी, महिंदळेसह मनपा हद्दीतील दहा गावांमध्ये रस्ते, गटारी, खुल्या जागांचा विकास, पथदिवे, आरोग्य सुविधा अशा स्वरूपाचा मूलभूत विकास व्हावा म्हणून मी अनेक कामे मंजूर करून घेतली. दरम्यान या दहा गावांच्या सर्वांगीण व परिपूर्ण विकासासाठी स्वतंत्र पॅकेजची आवश्यकता असल्याचे पाटील यांनी सांगितले.

यावेळी धुळे जिल्हा शहर राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे जिल्हाध्यक्ष रणजीतराजे भोसले यांनी सांगितले की, वलवाडीमध्ये आज जी विकासाची कामे दिसतात ती केवळ कुणाल पाटील यांच्यामुळेच झाले आहेत. ते आमदार असताना मंजूर झालेले कामे आजही सुरू आहेत. पराभवानंतरही धुळे ग्रामीणमधील जनता पाटील यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी आहे.

खा.डॉ.शोभाताई बच्छाव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, विकास कामांमध्ये कोणतीही तडजोड न करता ठेकेदारांनी उत्कृष्ट व गतिमान पद्धतीने कामे करणे गरजेचे आहे. मतदार संघातील कोणीही एक फोन केला तरी सुद्धा त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी तयार असते. याआधी वलवाडीसह धुळे ग्रामीण मतदार संघात माजी मंत्री स्व.दाजीसाहेब रोहिदास पाटील, कुणाल पाटील यांनी असंख्य विकासाची कामे केली आहेत. माजी मंत्री स्व. दाजीसाहेब रोहिदास पाटील यांनी केलेल्या अक्कलपाडा प्रकल्पामुळेच धुळे शहराचा पाणी प्रश्न सुटला आहे. श्री कुणाल बाबा पाटील हे आमदार असताना वलवाडी आणि मनपा हद्दीतील १० गावे तसेच ग्रामीण मतदारसंघांमध्ये विकासाला गती मिळाली. धुळे मनपा हद्दीतील दहा गावांच्या विकासासाठी असलेले स्वतंत्र पॅकेज प्रस्तावित असून ते शासनाकडून मंजूर करून घेण्याची जबाबदारी माझी असल्याचेही आश्वासन खा.बच्छाव यांनी यावेळी दिले.

कार्यक्रमाला डॉ.दिनेश बच्छाव, माजी सरपंच भटू चौधरी, माजी पस सदस्य छोटूभाऊ चौधरी, बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील, ज्येष्ठ नेते पंडितराव महाले, किरण नगराळे, भानुदास माळी, सामाजिक कार्यकर्ते तुषार रावळे, जगदीश चव्हाण,काँग्रेस पक्षाचे आबा पाटील,अरुण धुमाळ, ऍड.बी डी पाटील,अशोक गिरी, राजेंद्र भदाणे, गुणवंत वाघ, मयूर देवरे, पूजा रावळे, यशवंत दुसाने, अनिल चित्ते, नाना साळुंखे बाळूभाऊ रावळे,नाना साळुंखे,मनोज बैसाणे, बापूजी साळूंखे, ईश्वर साबळे, यशवंत दुसाने, अशोक पाटील, पुरुषोत्तम गरुड, निकम सर, राजेंद्र वाघ, के.एन पाटील, आर एल माळी आदी उपस्थित होते. आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते तुषार रावळे यांनी केले.

## धुळ्यात घरफोडीच्या दोन घटना

गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलुप तोडून आत प्रवेश केला. घरातील दहा ते बारा हजारांची रोख रक्कम, तीन ग्रॅम सोन्याचे दागिने असा मुद्देमाल चोरून नेला. दर्पण पाटोळे यांची आई सकाळी घरी आल्यानंतर घराचे कुलुप तुटलेले दिसुन आले. याप्रकरणी पोलीसांना तत्काळ माहिती देण्यात आली. एकाच वेळी दोन ठिकाणी चोरीचा प्रकार घटल्याने श्वान पथकाकला बोलावण्यात आले. श्वान पथकाने अहिल्यादेवी नगरच्या चौकापर्यंत माग दाखविला. ठसे तज्ञ पोउनि.धनंजय मोरे, पोहेकॉ.सचिन सोनवणे यांच्यासह शहर पोलीस स्टेशनचे डी.बी.पथकाचे पोहेकॉ.तुषार पारधी, अमित रनमळे, योगेश ठाकूर, पोकॉ. धम्मपाल वाघ यांनी घटनास्थळी भेट दिली.

## अध्यक्षपदी माजी आ.जोशी

चालविल्या जातात. संघाच्या स्थापनेला यंदा ९३ वर्षे झाली आहेत. ही संस्था शताब्दीकडे वाटचाल करत आहे. त्यादृष्टीने सेवक संघात सर्व जाती धर्माच्या युवक, युवतींचा सहभाग वाढावा, त्यादृष्टीने प्रयत्न रहातील आणि युवा वर्गाकडून नवनवीन कल्पना घेऊन कार्याला आधुनिकतेची जोड दिली जाईल, असे मोहन जोशी यांनी निवडीनंतर सांगितले. गांधीवादी नेते, विधानसभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांनी महाराष्ट्र हरिजन सेवक संघाचे अध्यक्षपद अनेक वर्षे भूषविले आणि सेवक संघाच्या महाराष्ट्रातील कार्यात मोलाचे योगदान दिले. हरिजन सेवक संघाचा कारभार आंतरराष्ट्रीय पातळीवर पसरला असून, अनेक विचारवंत, संशोधक, सामाजिक आणि राजकीय नेते यात सहभागी आहेत.

## योजनांची दुरुस्ती करणार : गिते

**गिते यांनी दिली आहे.**

इंजि. हरीभाऊ गिते यांनी लघु पाटबंधारे योजना गढावली, पडळपूर व रोझवे ता. तळोदा या कामांची नुकतिच पाहणी केली. ह्या योजना जुन अखेर पुर्ण करुन शेतकऱ्यांना शेतावर पाणी पोहचले अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या योजनांवर पाणी वापर संस्था स्थापन केल्या जाणार असून, त्यांचे सक्षमीकरण करून त्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पाणी वापर संस्थांकरिता इमारतींची उभारणी करण्यात येणार आहे. ज्या शेतात उभी पिके आहेत, तिथे खोदकाम करताना पिकांचे नुकसान न करता जमिनीतून बंदिस्त पाईप टाकण्यात येणार आहेत, असही गिते यांनी यावेळी सांगितले. पाहाणी दरम्यान जिल्हा जलसंधारण अधिकारी (मृद व जलसंधारण विभाग नंदुरबार) आर. एच. झुरावत, उपविभागीय जलसंधारण (नंदुरबार) अधिकारी, निलेश पाटील, शहादा उपविभागाचे उपविभाग श्रीनिवास पुरी, जलसंधारण अधिकारी तेजस रहाणे व कंत्राटदार लाभधारक शेतकरी उपस्थित होते.

## वन्य प्राण्यांची गणना सुरू

लळींग क्षेत्रात मचान उभारण्यात आले आहे. या मचानावर सुरक्षित राहुन अंधारात वावरणाऱ्या वन्य प्राण्यांची मोजदाद केली जाणार आहे. पाणवठयाच्या ठिकाणी पुश-पक्षांची मोजदाद होत आहे. यंदाच्या मोजणीतुन वन्य प्राण्याच्या संख्येत वाढ झाली की नाही हे स्पष्ट होईल. त्यानंतर निसर्गचक्र संवर्धित करण्यासाठी वन्य पशु-पक्षी आणि प्राण्यांसाठी आवश्यक त्या सुविधा देण्याचा प्रयत्न होईल, असेही भागवत यांनी सांगितले.

# धुळ्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे पालकमंत्री रावल यांच्या हस्ते उद्घाटन



**धुळे, दि.१२ (प्रतिनिधी) : मुख्यमंत्री वैदयकीय सहाय्यता निधी मिळविण्यासाठी आता रूग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांना मंत्रालयात जाण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सक्रीय केला आहे. त्यामुळे गरजवंत नागरीकांना निधी मिळविणे सहज श्नय होणार आहे, असे मत जिल्हयाचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी धुळयात व्य्नत केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे उदघाटन मंत्री रावल यांच्या हस्ते सोमवारी झाले.**

गजरवंत रूग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन पैसे दिले जातात. मात्र त्यासाठी अनेक नागरीकांना मुंबईत जावे लागते. त्यामुळे अनेक गरजवंतांना मुंबई पर्यंत पोहचता येत नाही आणि ते लाभापासुन वंचित राहतात. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठया कल्पकतेने जिल्हास्तरावर मुख्यमंत्री वैदयकीय सहाय्यता निधी कक्ष उभारण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नागरीकांना आता स्थानिक पातळी वरील कार्यालयात संपर्क साधुन आर्थिक सहाय्य घेता येईल. या उपक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस, राज्य कक्षाचे समन्वयक रामेश्वर नाईक यांच्या दुरदृष्टीमुळे जिल्हास्तरावर सहाय्यता निधी कक्ष उभारला गेला आहे, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या या कक्षाचे उदघाटन मंत्री रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, कक्षाचे अध्यक्ष डॉ. योगेश पाटील, सदस्य प्रमोद बागुल, कपिल पिवाल उपस्थित होते.

# जखाणे येथे अवकाळी पाऊसामुळे मोठे नुकसान



शहादा, दि.१२ (प्रतिनिधी)- शिंदखेडा तालुक्यातील जखाणे येथे काल दि.१२ रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास विजा, वादळ व पावसामुळे घरांचे व जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.यात जोरात आलेल्या वादळामुळे ज्ञानेश्वर श्रीराम बच्छाव यांच्या घरावर झाड कोसळून मोठे नुकसान झाले. तसेच तुषार शामराव बेहेरे यांच्या घरावर वीज पडल्याने घराचे पण नुकसान झाले, सुदैवाने जिवित हानी झाली नाही. तर संदीप सुदाम बेहेरे यांच्या गोठाचे छत कोसळल्याने एका गायीला इजा झाली आहे. तसेच पंचक्रोशीतील शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असल्याने प्रशासनाने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करून शासनाने तात्काळ मदत देण्याची मागणी जनतेमधून होत आहे.

## कदमबांडे लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा

(पान १ वरुन) रुपये व चषक, विकेटकीपर १ हजार रुपये व चषक व मालिकावीर २ हजार रुपये व चषक तसेच उपविजेता ७ हजार रुपये व चषक व विजेता संघास ११ हजार रुपये व चषक आकर्षक रोख बक्षीस देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी ज्या खेळाडुंचा जन्म ०१-०९-२००६ नंतरचा असेल अशाच खेळाडूस स्पर्धेमध्ये सहभाग घेता येईल. सदर स्पर्धा ही २५ मे पासून सुरु होणार असून लाल चेंडूवर खेळविण्यात येणार आहे. पांढरा गणवेश आवश्यक राहील. ज्या संघांना सदर स्पर्धेमध्ये भाग घ्यायचा असेल त्यांनी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशन कार्यालयाशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त संघांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष भूपेशभाई पटेल, प्रमुख सल्लागार राजवर्धन कदमबांडे, सचिव प्रीतेश पटेल व सर्व कार्यकारिणी सदस्य यांनी केले आहे.

## निधन वार्ता

### पुनमचंद जव्हेरी



शहादा, दि.१२- कोपर्ली ता.जि. नंदुरबार येथील मूळ रहिवासी व सध्या शहादा येथील पुनमचंद भगवानसिंग जव्हेरी (वय ८६) यांचे अल्पशा आजाराने सोमवार १२ रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा संभाजीनगर कॉलनी शहादा येथील निवासस्थानापासून निघाली व शांतीबन अमरधाम येथे सायंकाळी अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगी, तीन मुले, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. ते पत्रकार संतोष जव्हेरी, सामाजिक कार्यकर्ते दिनेश जव्हेरी, दीपक जव्हेरी यांचे वडील होत.

### कमलबाई चौधरी



बेटावद, दि.१२- शिंदखेडा तालुक्यातील बेटावद येथील कमलबाई राजाराम चौधरी (वय ७१) यांचे दि.१२ मे रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या राजाराम सखाराम चौधरी यांच्या पत्नी होत.

### स्वरुपाबाई पाटणी



धुळे, दि.१२- जैन समाजातील ज्येष्ठ नागरिक श्रीमती स्वरूपाबाई मुलचंदजी पाटणी (वय १०३ वर्षे) यांचे दि.११ मे रोजी रात्री ११:५० वाजता निधन झाले. त्या अशोक मुलचंदजी पाटणी यांच्या मातोश्री तसेच पवन, प्रदीप व अमित पाटणी यांच्या आजी होत.

पाहिजेत
मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
रिसेप्शनिस्ट/ऑफीस असिस्टंट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १०००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

पाहिजेत
१) छोटा हत्तीसाठी (Driver) ड्रायव्हर पाहिजे. लायसेन्स होणे आवश्यक.
२) ऑफिस कामासाठी (Helper) हेल्पर पाहिजे.
३) खारी/टोस्टच्या मार्केटींगसाठी सेल्समन पाहिजे.
लाईफ लाईन बेकरी
मालेगावरोड, धुळे
7507699616 / 8275103509

पाहिजेत
धुळे शहरातील विमा क्षेत्रात कार्यरत कार्यालयीन काम काजासाठी असिस्टंट व मॅनेजर पदासाठी उमेदवार पाहिजेत.
* पदवीधर व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक.
-: संपर्क :-
9423451280

पाहिजेत
१) १० वी/१२ वी पास-नापास मुले पाहिजेत.
२) मार्केटींगसाठी स्वत:ची मो.सायकल असलेले अनुभवी मुले पाहिजेत.
३) पूर्णवेळ ड्रायव्हर पाहिजे (मारुती व्हॅन)
समक्ष भेटा! सकाळी १० ते १२
कट एन कार्व
ओम डिजीटल, ग.नं.६, कोंडाजी तालीम जवळ, धुळे

पाहिजे
दुकान कामासाठी मुलगा पाहिजे.
-: संपर्क :-
सोनी टिव्ही सेंटर
पारोळारोड पोलीस चौकी समोर, धुळे
9373737883

पाहिजेत
Pharmcist पाहिजे (फ्रेशर)
Computer आवश्यक.
रामकृष्ण मेडीकल
7875686785
9096668184

पाहिजेत
नवीन ऑफिस करिता
मुला/मुलींची डायरेक्ट भरती
पात्रता- १० वी पास/नापास ते पदवीधर व १८ ते ३० वर्षे पगार ७५००/- ते २५०००/- हजार
रहाणे+जेवण मोफत
संपर्क :- पत्ता:- वाडीभोकर रोड, धुळे मो.९६५७६०८४५९

पाहिजे
हॉटेलसाठी मॅनेजर पाहिजे (संगणकचे ज्ञान आवश्यक)
आकर्षक पगार मिळेल
हॉटेल गौरव
मालेगावरोड, अग्रसेन चौक, धुळे
8698442361
8262022328

कार्टून पुठ्ठा
रु.१६.००
प्रति किलो बंडल
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड, धुळे
फोन : 230540
9422296340

पाहिजेत
बी.कॉम
Tally आवश्यक,
इंग्लिश/मराठी टायपिंग
गल्ली नं.२, लालबाग मारुती चौक, धुळे
-: संपर्क :-
9403424581

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony | Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०